# युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

नोंदणी क्र.: बी ओ एम / आर एस आर / ३५४ / ०३-०६-१९६७

# ५८ वा

# वार्षिक अहवाल

## २०२५-२०२६




युनियन बँक बिल्डींग, ४था मजला, रुम नं. १९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्र. : ०२२-३५११ ४२४६, ०२२-३५११ ४२५२, ०२२-२२६२ ९४८४ 9833185584

ubicrsoc@gmail.com www.unionbankcreditsociety.com Mobile App :ubi credit society

# युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

## -: व्यवस्थापक समिती :-



श्री. प्रशांत सं. सुर्वे
अध्यक्ष



श्री.रोहन गु. गोडसे
उपाध्यक्ष



श्री. सचिन अ. नरहरी
मानद सचिव



श्री. विष्णू द. कोकणे
सहसचिव



श्री. प्रसन्न ग. दामले
खजिनदार

## -: संचालक मंडळ :-



श्री. राजेश म. मतकरी



श्री. हरिश म. तायडे



श्री. भट्टूसिंग शा. ठाकूर



श्री. हरिभाऊ दे. कोगदे



श्री. प्रविण दा. सोनावले



श्री. प्रशांत भ. मोहिते



श्री. भुपेंद्र तु. पाटोळे



श्री. रामचंद्र कृ. कासारे



श्री. हेमंत द. हेटे



श्री. पांडुरंग दे. भंगाळे



श्री. अनिकेत अ. पेवेकर



सौ. प्रियंका नि. पाटील



श्रीमती मेघा अ. आचरेकर



श्री. अरविंद बु. कचरे
तज्ञ संचालक



श्री. नयन मा. सोळंकी
कार्यलक्षी संचालक



श्री. निलेश ह. गायकवाड
कार्यलक्षी संचालक

# युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

(नोंदणी क्र. बी ओ एम / आर एस आर / ३५४ / ३.६.१९६७)

युनियन बँक बिल्डींग, ४था मजला, रुम नं. १९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दूरध्वनी क्र.: २२६२ ९४८४, ३५११४२४६ / ५२

WhatApp No.: 9833185584 / Email : ubicrsoc@gmail.com / Website : unionbankcreditsociety.com / Play store : UBI CR SOCIETY

## ५८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( फक्त सभासदांसाठी )

युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. संस्थेची सन २०२५-२६ यावर्षाची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट, २०२६ रोजी सायं. ठीक ४.३० वाजता युनियन बँक ऑफ इंडिया बिल्डींग, २रा मजला, कॅन्टीन हॉल, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे आयोजित करण्यात आली आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस **ऑनलाईन** उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### सभेपुढील विषय सुची

१. दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ५८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे.
३. सन २०२५ - २०२६ या वर्षाचा अहवाल, नफा - तोटा व ताळेबंद पत्रक स्वीकृत करणे.
४. सन २०२५-२०२६ यावर्षासाठी मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
५. सन २०२५-२०२६ यावर्षाचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२६-२०२७ वर्षाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
७. सन २०२६-२०२७ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व गतवर्षी झालेल्या अतिरिक्त खर्चास स्विकृती देणे.
८. पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थांसाठी सुधारित आदर्श उपविधी (२०२६) स्वीकृत करणे.
९. करनिर्धारण वर्ष सन २०११ व करनिर्धारण वर्ष सन २०१३ या वर्षाचा देय आयकर व व्याज भरणेबाबत निर्णय घेणे.
१०. संस्थेच्या हीरक महोत्सव कार्यक्रमासाठी अंदाजित खर्चास मंजूरी देणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

व्यवस्थापक समितीच्या आदेशावरुन,

(सचिन अ. नरहरी)
मानद् सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३/०८/२०२६

सूचना :

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न असल्यास ते दि. १४/०८/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात आणून देणे.
३. संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवर व वॉट्स ॲपद्वारे उपलब्ध होतील.
४. उपविधी क्र. ग. १.३ (४) अनुसार लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत स्विकारावा अन्यथा संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्यात येईल. २०२२-२३ सालातील लाभांश अद्याप घेतला नसल्यास ३१ डिसेंबर, २०२६ पुर्वी संस्थेत संपर्क करावा.
५. थकित कर्जदार / जामिनदार यांचा लाभांश संबंधित थकित कर्जात वर्ग करण्यात येईल.

**२०२६-२०२७ सालाचे सभासद सहकार प्रशिक्षण हे वार्षिक सभेच्या दिवशी ऑनलाईन दुपारी ३.४५ वाजता आयोजित केले आहे.**



श्री. प्रशांत सं. सुर्वे - अध्यक्ष



श्री. राजेश म. मतकरी - माजी अध्यक्ष

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सर्वप्रथम मी स्वत: व माझे सर्व संचालक आपल्या सर्वांचे आजच्या सभेसाठी उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानतो. तसेच कार्यकारी मंडळाच्या वतीने सहर्ष स्वागत करतो.

आपल्या अतूट विश्वासामुळे संस्थेने नुकतीच ५९ वर्षे पूर्ण केली आहेत. संस्थेचे कार्यकारी मंडळ स्थानीय लोकाधिकार समिती, युनियन बँक ऑफ इंडिया एस.सी./एस.टी. एम्प्लॉईज असोसिएशन, मुंबई व ऑल इंडिया बँक ऑफिसर्स महासंघ यांच्या सहकार्याने उत्तम कामकाज करीत आहे.

संस्थेच्या माध्यमातून संचालक मंडळ विविध योजना सभासदांसाठी राबवीत आहे व त्याचा फायदा अनेक सभासदांना होत आहे. संस्थेने सन २०१९ ते २०२६ या कालावधीत संस्थेचे माजी अध्यक्ष राजेश मतकरी यांच्या संकल्पनेतून व संचालक मंडळाच्या समर्थनाने खालील प्रकारचे लहान मोठे सकारात्मक बदल केले आहेत.

- वार्षिक अहवालात अध्यक्षांसोबत मानद सचिव व खजिनदार यांचे फोटो समाविष्ट करणे, संस्थेच्या योजना व माहितीसह मोठे कॅलेंडर प्रत्येक शाखेत देणे.
- संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण कर्ज, वैयक्तिक कर्ज, आरोग्य व टर्म विमा इत्यादी सुविधा लागू करणे.
- कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले, नवीन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्याचे प्रयत्न चालू आहेत, दिवस-रात्र कार्यरत CCTV कॅमेरे सुरु करण्यात आले, सदस्य व विक्रेत्यांची रक्कम अदा करण्यासाठी CAPS सुविधा सुरु करण्यात आली आहे.
- पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र टेबल, खुर्च्या व नावफलक उपलब्ध केले तसेच मोबाईल ॲप सुरु करुन सदस्यांना शेअर सर्टिफिकेट, लेजर, लाभांश व इतर माहिती ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१९ पासून संस्थेची वार्षिक सभेसाठी होणारी अंदाजे रक्कम रु. ३.०० लाख बचत होते.
- संस्थेने घेतलेल्या सामूहिक निर्णयामुळे युनियन बँक ऑफ इंडिया एस.सी./एस.टी. एम्प्लॉईज असोसिएशन, मुंबई व संस्था यांनी शिवाजी पार्क येथे एकच अन्नवाटप स्टॉल ठेवण्याचा निर्णय घेतला.
- संचालकांचे नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर इत्यादी दौरे बंद करुन खर्चात बचत केली व युनियन बँकेची CAIIB/JAIIB परिक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासदांना गुणगौरव पारितोषिक चालू केले.
- सभासदांसाठी आवर्त ठेव योजना सुरु केली.तसेच निवृत्त सदस्यांना चहापानी करुन त्यांचे आभार मानले जातात.
- 'कोविड' काळात सदस्यांना आर्थिक मदत व लाभांश देण्यात आला.
- वार्षिक सभेसाठी मागविण्यात आलेले शिल्लक काजू विकूण आलेल्या रक्कमेतून लहान मॉनिटरऐवजी मोठे मॉनिटर विकत घेतले व खर्चात बचत केली.
- बँकेच्या नविन कर्मचाऱ्यांना सभासदत्वासाठी आकर्षित करण्यासाठी जास्तीत जास्त अर्थसहाय्य देण्याचा प्रयत्न केला, SOD वापर कमी करुन संचालकांची जबाबदारी कमी करण्यात आली व SOD वरील मासिक व्याज खर्च कमी करण्यात आला.
- संस्था नोव्हेंबर-२०२७ पर्यंत स्वत:च्या निधीवर चालविण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे तसेच कर्मचाऱ्यांना एका महिन्याचा पगाराइतका Festival Advance सुरु करण्यात आला.
- सोशल मिडियाचा वापर वाढवून WhatsApp द्वारे सदस्यांशी संपर्क ठेवण्यात येत आहे व वार्षिक सभा चालू असतानाच सदस्यांच्या खात्यात त्वरित लाभांश जमा करण्यात येत आहे.
- संस्थेच्या व्यवसायात सन २०१९ मधील रु. ९७.६० कोटी वरुन सन २०२६ मध्ये रु. २३६.१८ कोटी इतकी वाढ झालेलीआहे व कर्मचाऱ्यांना संस्थेच्या अंतर्गत पदोन्नती देण्यात येते तसेच दरवर्षी जुलैमध्ये संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे Job Rotation करण्यात येते ज्यामुळे सर्वच कर्मचाऱ्यांना सर्व कामाची माहिती होते.
- चेअरमन केबिनमध्ये संस्थेच्या इतिहासाचे फोटो प्रदर्शित करण्यात आले आहेत त्यामुळे नवीन लोकांना त्याची माहिती मिळण्यास मदत होत आहे.
- संस्थेमध्ये सहाय्यक व्यवस्थापक, व्यवस्थापक व वरिष्ठ व्यवस्थापक अशी नवीन पदे निर्माण करण्यात आली. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यास व त्याच्या कुटुंबास आरोग्य विमा रु. २०.०० लाख व टर्म इन्शुरन्स रु. ५०.०० लाख करण्यात आला.
- युनियन बँकेच्या बदलत्या MCLR दरानुसार सभासदांच्या कर्जावरील व्याजदर कमी करण्यात आला आणि सर्व कर्ज/ठेव अर्जांची सॉफ्ट कॉपी सदस्यांना पाठवून छपाई व कुरिअर खर्चात बचत करण्यात येत आहे.

संस्थेच्या दफ्तरी नोंदीप्रमाणे अहवाल सालात आणि आजपर्यंतच्या अहवालात दिलेल्या चौकटीत नमूद केलेले संस्थेचे मान्यवर सभासद काळाने आपल्यापासून हिरावून नेलेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे.

आपण आमच्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्व कार्यकारी मंडळाच्यावतीने मी आपला आभारी आहे. आपल्या संस्थेचे सर्व सन्माननीय माजी सभासद, नाममात्र सभासद, युनियन बँकेचे व्यवस्थापन, माननीय सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय पूणे, माननीय जिल्हा उपनिबंधक कार्यालय मुंबई, वैधानिक व करलेखापरिक्षक सी.ए.काळे आणि कोयंडे, अंतर्गत लेखापरिक्षक मे.अथर्व अँड असोसिएट्स, माझे कार्यकारी मंडळातील सदस्य व संस्थेत कार्यरत कर्मचारी वर्ग या सर्वांचा मी आभारी आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला नम्र

श्री. प्रशांत सं. सुर्वे

अध्यक्ष



सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेचा ५८वा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेने ०३ जून २०२६ रोजी ६०व्या वर्षात पदार्पण केले आहे. संस्थेने ३१ मार्च २०२६ अखेर रु. २३६.१८ कोटींचा एकत्रीत व्यवसाय केला आहे. चालूवर्षी १९६ नविन सभासदांनी संस्थेत नोंदणी केली आहे व वर्षअखेर ४६४३ सभासद संख्या आहे. येत्या काळात सर्वांनी मिळून जास्तीत जास्त सभासद वाढविण्यासाठी प्रयत्न करुयात.

संस्थेने माहे नोव्हेंबर २०२२ पासून सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांचा सत्कार समारंभ कार्यक्रम घेणे चालू केले आहे. या सभासदांनी इतकी वर्षे केलेल्या सहकार्याची दखल घेऊन त्यांना संस्थेविषयी आलेले अनुभव ऐकून घेऊन आम्ही कामकाजात सुधारणा करीत आहोत.

संस्थेच्या नाममात्र सभासदांनी संस्थेवर विश्वास ठेवून गुंतवणूक केल्यामुळे आज आपण धनलक्ष्मी मुदत ठेवीचा रु. ३७.९६ कोटीचा टप्पा पार करु शकलो. त्यासाठी नाममात्र सभासदांचे संचालक मंडळ खूप-खूप आभारी आहे. ज्या माजी सभासदांनी अद्याप आपल्या संस्थेत गुंतवणूक केली नसेल, त्यांनीही गुंतवणूक करुन भरघोस व्याजाचा फायदा करुन घ्यावा.

सन २०२५-२०२६ सालाची अर्थिकपत्रके आपल्यासमोर मांडताना मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की चालूवर्षी संस्थेला व्याजातून रु.२१.९३ कोटी उत्पन्न मिळाले आहे.

संस्थेचे सन २०१४-१५ ते सन २०२४-२५ या वर्षांचे रु. ९.७४ कोटी रक्कमेचे आयकर संबंधीत अनेक दावे आयकर खात्याकडे प्रलंबित होते. परंतु यावर्षी संचालक मंडळाने धाडसी निर्णय घेऊन संस्थेचे कर सल्लागार सी.ए. काळे आणि कोयंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने आयकर संबंधीत क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेऊन कामकाज केले. त्याचा संस्थेला फायदा झाला व कलम ८० पी ची संस्थेला सवलत मिळाली आहे. यामुळे संस्थेला आयकर मागणी रक्कमेत मोठी सवलत मिळाली आहे. हे सर्व आम्ही सर्व सभासद व हितचिंतक यांच्या आमच्यावरील विश्वासामुळे करु शकलो. तसेच करनिर्धारण वर्ष २०११ व करनिर्धारण वर्ष २०१३ ची आयकर प्रकरणे प्रलंबित असून, त्यांची आयकर रक्कम व व्याज माफ करुन घेण्यासाठी प्रक्रिया चालू करण्यात आली आहे.

संस्थेने सभासदांसाठी विश्रामगृह खर्च पूरक योजनेतून शिर्डी, अलिबाग, लोणावळा, कोल्हापूर व मुंबई येथे नाममात्र दरात विश्रामगृहांची सोय उपलब्ध केली आहे.

यावर्षी संस्थेने दिनांक ०३ जून २०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात ५९ वा वर्धापनदिन साजरा केला. या कार्यक्रमाला युनियन बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संस्थेच्या कार्यालयात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आपल्या सर्वांच्या साक्षीने पुढील वर्षी आपल्याला हिरक महोत्सव साजरा करावयाचा आहे.

आपल्या संस्थेचे सर्व सन्माननीय आजी-माजी सभासद, नाममात्र सभासद, युनियन बँक व्यवस्थापन, माननीय सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय पुणे, माननीय जिल्हा उपनिबंधक कार्यालय मुंबई, वैधानिक लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरीक्षक आणि माझे कार्यकारी मंडळातील संचालक व संस्थेचे कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

आपला नम्र

**श्री. सचिन अ. नरहरी**

मानद सचिव



# युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

संस्थेच्या विविध योजनांचा आपल्या माहितीसाठी थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे सादर करीत आहे. यावरुन आपल्या निदर्शनास येईल की, संस्थेने या आर्थिक वर्षात उत्तम अशी प्रगती केली आहे. भागभांडवल, धनलक्ष्मी मुदत ठेव इत्यादींमध्ये आपणांस प्रकर्षाने वाढ झालेली निदर्शनास येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **सभासद :** वर्षारंभी सभासद संख्या ४७०५ इतकी होती. अहवालवर्षात १९६ नविन सभासद दाखल झाले व २५८ सभासदांनी सभासदत्व बंद केल्यामुळे ३१ मार्च २०२६ अखेर सभासद संख्या ४६४३ इतकी आहे व नाममात्र सभासद संख्या २४५ इतकी आहे. | 1. | **Membership :** Our membership stands 4643 from 4705 as on 31/03/26, The increase of 196 new members & resignation of 258 Members due to retirement Nominal members 245. |
| २. | **भाग भांडवल :** अहवालसाली संस्थेच्या वसूल भागभांडवलामध्ये रु. ३,६३,०७,०००/- इतकी वाढ होऊन गतवर्षी असलेले रु. ४८,१२,८०,५००/- वसुल भागभांडवल अहवालसाली रु. ५१,७५,८७,५००/- इतके झालेले दिसून येते. | 2. | **Share Capital :** During this Financial Year the Share Capital increased by Rs. 3,63,07,000/- and stood at Rs. 51,75,87,500/- against that of Rs. 48,12,80,500/- of the last year. |
| ३. | **दीर्घ मुदत कर्ज :** वर्षारंभी रु.२,०७,७५,३१,४६४.७९ ची कर्जे येणे बाकी होती आणि अहवालसाली २६२ सभासदांना रु.५२,३२,०१,२८०.३६ ची नविन कर्जे मंजूर करण्यात आली व रु.५२,४२,४८,९९६.७३ ची कर्ज वसूली होऊन वर्षाअखेरीस रु. २,०७,२७,००,२६१.४२ ची मुदत कर्जे येणे बाकी आहेत. | 3. | **Long Term Loans :** At the beginning loan outstanding stood at Rs.2,07,75,31,464.79 during the year 262 members were sanctioned loans of Rs. 52,32,01,280.36 & after the recoveries of Rs.52,42,48,996.73 the Long loans at the end of the year were Rs. 2,07,27,00,261.42 |
| ४. | **अल्प मुदत कर्ज :** वर्षारंभी रु.२३,०८,१४६.००ची अल्प मुदत कर्जे येणे बाकी होती आणि अहवालसाली ५४ सभासदांना रु. ३१,१५,०५२.४१ ची नविन कर्जे मंजूर करण्यात आली. अहवालसालात सदर खात्यात रु.४२,९२,५५५.४१ ची वसूली जमा होऊन वर्षाअखेरीस रु. ११,३०,६४३.०० ची अल्प मुदत कर्जे येणे बाकी आहेत. | 4. | **Short Loans :** At the beginning loan outstanding stood at Rs.23,08,146.00 during the year 54 members were sanctioned loans of Rs. 31,15,052.41 & after the recoveries of Rs.42,92,555.41 the Short loans at the end of the year were Rs. 11,30,643.00 |
| ५. | **मृत सभासद कल्याणकारी योजना :** या योजने अंतर्गत मृत सभासदांच्या वारसाला रु. ४.०० लाख आर्थिक मदत दिली जाते. अहवालसाली १४ मृतसभासदांच्या वारसांना या योजनेतून रुपये ५१.८० लाख आर्थिक मदत देण्यात आली. वर्षाअखेर या निधीत रुपये ८,१३,००,४८०.७९ इतकी रक्कम बाकी आहे. | 5. | **Members Death Benevolent Scheme :** in this scheme an aid of Rs. 4.00 lakhs is given to legal hairs of deceased member. we have given as an aid of Rs. 51.80 Lakhs to legal heirs of 14 deceased members. At the end of the year balance fund is Rs. 8,13,00,480.79 |
| ६. | **शैक्षणिक गुणगौरव निधी योजना :** अहवालसाली या योजने अंतर्गत शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक परिक्षा आणि पदवी परिक्षेत ७५% आणि अधिक गुणांकानी उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यांना उत्तेजनार्थ रु.८१,०००/- ची रोख बक्षिसे सभासदांच्या खात्यात जमा करण्यात आली. | 6. | **Education Welfare Scheme :** In this scheme we give cash incentives to the ward of members, who have passed Secondary & Higher Secondary School and Graduation Examination with 75% & above. During the year Rs. 81,000/- were given directly credited to the members account. |
| ७. | **सभासद सहकार प्रशिक्षण शिबिर :** केंद्रशासनाने सहकार कायद्यामध्ये केलेल्या ९८व्या घटनादुरुस्तीन्वये, संस्थेच्या सभासदांना कामकाजाविषयी सर्वांगीण माहिती व्हावी याकरीता संस्थेतर्फे सभासद प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे बंधनकारक आहे त्याअनुषंगाने येत्या वार्षिक सभेत सहकार तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सभासद सहकार प्रशिक्षण शिबिर घेण्याचा आमचा मानस आहे. | 7. | **Member Co-operative Training Programme :** As per the 98th amendment it has been mandatory for all credit societies to educate the members through conducting training programmes. As per guidlines, we proposed to hold members co-operative training programme at coming Annual General Meeting. |
| ८. | **धनलक्ष्मी मुदत ठेव योजना :** वर्षारंभी या योजनेअंतर्गत रु. २८,०८,६४,१६५.०० ठेवी जमा होत्या. अहवालसाली सभासदांनी रु. ३८,३१,९५,७६९.००ठेवी संस्थेकडे गुंतविल्या आहेत व मुदतसमाप्ती नंतर रु. २८,४५,३९,६३१.००ठेवी परत करण्यात येऊन वर्षअखेर संस्थेकडे रु.३७,९६,४७,७८०.०० ठेवी जमा आहेत. | 8. | **Dhanlaxmi Fixed Deposit Scheme :** At the beginning Rs.28,08,64,165.00deposits was outstanding under this scheme. During the year new deposits of Rs. 38,31,95,769.00 have been invested and Rs. 28,45,39,631.00 worth of deposits were refunded on maturity. At the end of the year outstanding deposits were at Rs. 37,96,47,780.00 |
| ९. | **धन्वंतरी वैद्यकीय योजना :** या योजने अंतर्गत २५ सभासदांना रु.२,३२,५९९.७६ ची आर्थिक मदत देण्यात आली. अहवाल वर्षअखेर या योजनेत शिल्लक रक्कम रु. ३,३१,५४,०९०.९३ जमा आहेत. | 9. | **Dhanwantari Medical Aid Scheme :** An amount of Rs.2,32,599.76was given as financial support under the scheme to 25 members. At the end of the year Dhanwantari Medical Aid Fund is Rs. 3,31,54,090.93 |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | **जामिन हमी योजना :** वर्षारंभी या योजनेअंतर्गत रु. ४,९२,१२,४०३.०४ शिल्लक होती. सभासदाचे आजारपणामुळे कर्ज थकीत असल्यास नियमानुसार तात्पुरते कर्जाचे हप्ते भरण्याची तरतूद आहे. शिवाय मृत सभासदाच्या कर्जफेडीकरीता रु.८.०० लाखाची मदत देण्यात येते. चालुवर्षी या योजनेतून ७ सभासदाचे रु. ३८,२७,७८६.०० इतके कर्ज माफ केले असून या निधीमध्ये मृत सभासदांची रु. २,५८,२१०/- इतकी रक्कम वर्ग करण्यात आली. त्यामुळे वर्षाअखेर या निधींमध्ये रु. ५,५३,३१,८४४.०४ इतकी शिल्लक आहे. | 10 | **Surety Guarantee Scheme :** Loan of members remain unpaid/overdue due to serious ailments, then the instalment upto six months can be adjusted from this fund. In case death of member, the society will give financial assistance upto Rs. 8.00 lakh to repay the loan. In this scheme at the beginning of the year balance is Rs. 4,92,12,403.04 During Current year Rs. 38,27,786.00 paid towards loan repayment of 7 deceased members and Rs. 2,58,210 subscription transferred from deceased members. At the end of the year is Rs. 5,53,31,844.04 |
| ११ | **कर्जमुक्ती हमी योजना :** या योजनेअंतर्गत कर्जदार सभासद मृत पावल्यास रु.१४.५० लाखावरील कर्ज माफ केले जाते. चालू वर्षी या योजनेतील ३ मृत सभासदांचे कर्ज माफ करण्यासाठी रु. ११,८८,९७४.०० इतकी रक्कम वापरण्यात आली. याकरिता सभासदाकडून वार्षिक नाममात्र शुल्क आकारले जाते. वर्षाअखेर रु. २,९८,६८,७७२.३७ इतकी रक्कम शिल्लक आहे. | 11 | **Karjmukti Hami Yojana :** In this Scheme loan above Rs.14.50 lacs will be adjusted on death of the member (lonee). For Loan waiver of 3 deceased member Rs. 11,88,974.00 used. We collect nominal amount from member (loanee). In this scheme at the end of the year balance is Rs. 2,98,68,772.37 |
| १२ | **विश्रामगृह खर्च पुरक योजना :** या योजने अंतर्गत सभासदांकरीता नाममात्र दरात विविध विश्रामगृहांची सोय उपलब्ध केली आहे. सदर योजनेत वर्षारंभी रु. ५२,४८,९४०.४०इतकी रक्कम शिल्लक होती. या निधीमध्ये वर्षाअखेर रु.३३,०१,३६९.४० इतकी रक्कम शिल्लक आहे. | 12 | **Holiday Home Scheme (Tie-up) :** Under this scheme member can avail Holiday Home facility at concessional rate. At the beginning of the year fund balance is Rs. 52,48,940.40 Balance amount at the end of the year is Rs. 33,01,369.40 |
| १३ | **लाभांश :** आमच्या मान्यवर सभासदांना ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या जमा भागभांडवलावर ९% लाभांश म्हणून देण्याची शिफारस कार्यकारी मंडळ करीत आहे आणि गतवर्षीप्रमाणे यंदाही सभासदांचा लाभांश त्यांच्या १५ अंकीबचत खात्यामध्ये थेट जमा करण्याचे कार्यकारी मंडळाने ठरविले आहे. | 13 | **Dividend :** The Managing Committee proposes 9% dividend on Share Capital as on 31st March 2026 on pro-rata basis. This will be credited to respective15 digit CBS Accounts as per the regular practice. |
| १४ | **हिशेब तपासणी :** अहवालसाली मे.अथर्व अँड असोसिएट्स यांची अंतर्गत लेखापरिक्षक व काळे आणि कोयंडे यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या तपासणीबाबतचे अहवाल प्राप्त झाले असून संस्थेच्या सर्वांगीण कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे. तसेच वैधानिक लेखापरिक्षक काळे आणि कोयंडे यांनी अहवाल सालाचे लेखापरिक्षण पूर्ण केले असून संस्थेला "अ" ऑडिट वर्ग दिला आहे. | 14 | **Audit :** For the year under report M/s. Atharva & Associates were appointed as our internal Auditors and Government Auditors were Kale & Koyande. We have received their Audit Report and they have conveyed their satisfaction regarding the overall working of the society & have awarded class "A" to the society. |

त्याचप्रमाणे संस्था स्वबळावर करण्यासाठी कार्यकारी मंडळाचे प्रयत्न चालू आहेत. युनियन बँकेची कर्ज मर्यादा ८० कोटी पर्यंत कमी करण्यात आली आहे. तसेच गेल्यावर्षात वार्षिक सभेत मंजूर केलेल्या अंदाज पत्रकापेक्षा फक्त वार्षिक सर्वसाधारण सभेचा खर्च वगळता इतर सर्व खर्च मर्यादीत करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे गतवर्षी व यावर्षी राखीव निधीची तरतूद सहकार नियमाप्रमाणे २५ टक्के करण्यात आली आहे.

**श्री. प्रसन्न ग. दामले**
खजिनदार

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

## श्रध्दांजली / HOMAGE

| PF NO. | MEMBERS NAME | BRANCH | PF NO. | MEMBERS NAME | BRANCH |
|---|---|---|---|---|---|
| 755492 | LATE MR. ADHAV VIKAS BHAGWAN | KOKANGAON | ७५५४९२ | स्व. श्री. आढाव विकास भगवान | कोकणगाव |
| 654622 | LATE MR. CHAUDHARI YOGESH D. | PHONDAGHAT | ६५४६२२ | स्व. श्री. चौधरी योगेश ज्ञा. | फोंडाघाट |
| 336401 | LATE MR. PATIL DILIP CHANDRAKANT | ZO PUNE | ३३६४०१ | स्व. श्री. पाटील दिलीप चंद्रकांत | ZO पुणे |
| 380090 | LATE MR. BHAGWATKAR SUBODHCHANDRA | ARB PUNE | ३८००९० | स्व. श्री. भागवतकर सुबोधचंद्र | ARB पुणे |
| 667538 | LATE MR. LAMGHARE ASHISH BHIMRAO | DONGARGARH | ६६७५३८ | स्व. श्री. लमघरे अशिश भिमराव | डोंगरगड |
| 412406 | LATE MR. RANE MAHENDRA SUDHAKAR | C.O. | ४१२४०६ | स्व. श्री. राणे महेंद्र सुधाकर | कें. का. |
| 622355 | LATE MR. GODISELA MADHU | ZAO HYDERABAD | ६२२३५५ | स्व. श्री. गोडीसेला मधू | ZO हैदराबाद |
| 759354 | LATE MR. NARNAWARE AJAY B. | SAKOLI | ७५९३५४ | स्व. श्री. नरनवरे अजय बलिदास | साकोली |

# UNION BANK OF INDIA EMPLOYEES CO-OP. CREDIT SOCIETY LTD., MUMBAI

## PROFIT & LOSS A/C FOR THE PERIOD 1.4.2025 TO 31.03.2026

| 2024-25 | EXPENDITURE | 2025-26 | 2025-26 | 2024-25 | INCOME | 2025-26 | 2025-26 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **INTEREST PAID** | | | | **INTEREST EARN** | | |
| 7,34,68,158.00 | INT PAID ON SOD A/C UNION BANK | 6,29,77,541.00 | | 20,36,83,866.71 | INT.EARNED ON LONG LOANS | 20,89,98,066.58 | |
| 2,37,27,082.00 | INT PAID ON DHANLAXMI FIXED DEPOSIT | 3,21,11,763.00 | | 1,43,114.63 | INT.EARNED ON SHORT LOANS | 1,92,890.41 | |
| 1,93,67,414.00 | INT ON MDBS SUBS/MDB SCHEME | 2,23,04,204.00 | | | | 20,91,90,956.99 | |
| 80,97,791.00 | INT ON SURETY GURANTEE SUBS/SCHEME | 96,89,017.00 | | | | | |
| 1,00,71,958.00 | INT PROVIDED ON VARIOUS FUND/SCHEME | 1,12,14,041.00 | | -28,01,845.00 | LESS :INT ACCRUED ON NPA ASSET PRIOR YR | 37,83,487.00 | 20,54,07,469.99 |
| 0.00 | INT ON CUM-SHR-DEPOSIT | 11,17,662.00 | 13,94,14,228.00 | | | | |
| | | | | 8,20,354.00 | INT.EARNED ON STAFF LOANS | 9,20,063.00 | |
| | **MANAGEMENT EXPENSES** | | | 80,588.00 | INTEREST EARN ON FD INVESTMENT | 1,03,630.00 | |
| 41,55,910.23 | STAFF SALARIES | 43,56,816.99 | | 86,98,950.00 | INTEREST EARN ON RESERVE FUND | 91,01,469.00 | 1,01,29,384.00 |
| 1,01,125.18 | STAFF LEAVE ENCASHMENT | 1,97,646.07 | | | | | |
| 2,53,904.00 | SOCIETY CONT.TO STAFF PF | 2,59,787.00 | | 14400.00 | HONORARIUM TO M.C.MEMBERS | | 0.00 |
| 16,566.00 | P.F. ADMIN CHARGES | 16,882.00 | | 0.00 | INT. RECD ON INCOME TAX REFUND | | 8,19,972.00 |
| 32,800.00 | MEDICAL ALLOWANCE TO STAFF | 32,800.00 | | | | | |
| 98,922.20 | STAFF TERM INSURANCE | 98,921.80 | | | | | |
| 2,29,356.00 | STAFF HEALTH INSURANCE | 2,65,519.00 | | | | | |
| 1,17,864.00 | LEAVE FARE CONCESSION TO STAFF | 1,27,272.00 | | | | | |
| 28,679.00 | CONVEYANCE EXPENSES | 12,233.00 | | | | | |
| 31,318.00 | ENTERTAINMENT EXPENSES | 8,107.00 | | | | | |
| 2,05,027.10 | PRINTING & STATIONERY | 2,61,905.64 | | | | | |
| 15,535.93 | BANK CHARGES | 12,673.02 | | | | | |
| 1,116.00 | BOOKS & PERIODICALS | 0.00 | | | | | |
| 8,492.20 | POSTAGE EXPENSES | 29,818.36 | | | | | |
| 96,667.06 | COURIER EXPENSES | 59,387.15 | | | | | |
| 67,526.32 | OFFICE EXPENSES | 3,01,391.48 | | | | | |
| 18,719.90 | TELEPHONE BILL EXPENSES | 17,308.96 | | | | | |
| 100.00 | MISCELLANEOUS EXPENSES | 4,556.00 | | | | | |
| 1,64,972.00 | DOCUMENT SCANNING CHARGES | 0.00 | | | | | |
| 78,176.00 | REPAIRS & MAINTENANCE | 72,950.00 | | | | | |
| 11,250.00 | DAILY ALLOW.TO M.C.MEMBERS | 10,125.00 | | | | | |
| 2,29,899.50 | CONVEYANCE ALLOW.TO M.C.MEMBER | 1,12,363.00 | | | | | |
| 4,74,000.00 | MEETING ALLOWANCES TO M.C.MEMBER | 4,70,000.00 | | | | | |
| 73,278.24 | MANAGING COMM.MEETING EXPENSES | 24,136.00 | | | | | |
| 2,500.00 | PROFESSIONAL TAX (EMPLOYER) | 2,500.00 | | | | | |
| 5,30,300.00 | PROFESSIONAL FEES | 13,52,410.00 | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1,82,160.00 | SOFTWARE DEVELOPEMENT & MAINT. EX | 1,94,100.00 | | | | | |
| 97,384.00 | GIFT EXPENSES | 1,05,309.52 | | | | | |
| 7,905.00 | POOJA EXPENSES | 17,137.00 | | | | | |
| 1,220.00 | FRANKING & BANK PROCESSING CHARGES | 4,100.00 | | | | | |
| 3,92,093.64 | A.G.M.EXPENSES | 7,95,849.08 | | | | | |
| 1,250.00 | SUB.TO MUMBAI KOKAN SAL.EAR.SANGH | 2,500.00 | | | | | |
| 41,368.00 | ADVERTISEMENT EXPN | 0.00 | | | | | |
| 50,885.00 | HOLIDAY-HOME EXPN | 37,021.00 | | | | | |
| 2,43,843.65 | CGST EXPN A/C | 2,02,384.91 | | | | | |
| 2,43,843.65 | SGST EXPN A/C | 2,02,384.91 | | | | | |
| 53,561.00 | LOAN RECOVERY CHARGES | 14,394.06 | | | | | |
| 1,000.00 | APPEAL FILING CHARGES | 0.00 | | | | | |
| 27,31,446.00 | PROVISION FOR INCOME TAX | 0.00 | | | | | |
| 25,00,000.00 | PROVISION FOR INCOME TAX PRIOR YEAR | 6,78,991.00 | | | | | |
| 0.00 | TDS PAID FOR PRIOR YEAR | 1,84,990.00 | | | | | |
| 8,254.50 | DISCARD OF ASSET | 0.00 | 1,05,46,670.95 | | | | |
| | | | | | | | |
| | **AUDIT FEES PROVISION** | | | | | | |
| 11,83,366.00 | STATUTORY AUDIT FEES | 11,79,796.00 | | | | | |
| 50,000.00 | INTERNAL AUDIT FEES | 1,20,000.00 | | | | | |
| 55,000.00 | TAX AUDIT FEES | 55,000.00 | 13,54,796.00 | | | | |
| | | | | | | | |
| | **OTHER PROVISION** | | | | | | |
| 2,24,677.00 | PROVISION FOR GRATUITY TO STAFF | | 1,89,717.00 | | | | |
| | | | | | | | |
| | **DEPRECIATION** | | | | | | |
| 89,322.34 | EDP SOFTWARE & HARDWARE (40%) | 57,779.68 | | | | | |
| 1,60,387.55 | FURNITURE&FIXTURE (10%) | 1,51,748.80 | | | | | |
| 43,458.99 | OFFICE EQUIPMENT (15%) | 36,940.14 | 2,46,468.62 | | | | |
| | | | | | | | |
| 6,05,00,594.16 | **NET PROFIT 2025-26** | | 6,46,04,945.42 | | | | |
| **21,06,39,428.34** | **TOTAL Rs.** | | **21,63,56,825.99** | **21,06,39,428.34** | **TOTAL Rs.** | | **21,63,56,825.99** |

**KALE & KOYANDE**
**Chartered Accountant**
DATE : 27-07-2026
PLACE : MUMBAI

**PRASHANT S. SURVE** CHAIRMAN | **ROHAN G. GODASE** VICE CHAIRMAN | **SACHIN A. NARHARI** HON. SECRETARY | **VISHNU D. KOKANE** JOINT SECRETARY | **PRASANNA G. DAMLE** TREASURER

# UNION BANK OF INDIA EMPLOYEES CO-OP. CREDIT SOCIETY LTD., MUMBAI
## BALANCE SHEET AS ON 31.03.2026

| 2024-25 | CAPITAL & LIABILITIES | 2025-26 | 2025-26 | 2024-25 | PROPERTY & ASSETS | 2025-26 | 2025-26 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 60,00,00,000.00 | **AUTHORISED SHARE CAPITAL** | | 60,00,00,000.00 | | **CASH & BANK BALANCE** | | |
| | (1200000 SHARES OF RS.500/-EACH) | | | 0.00 | CASH IN HAND | 0.00 | |
| 48,12,80,500.00 | **SHARE CAPITAL - PAID UP** | 48,12,80,500.00 | | 10,000.00 | UNION BANK C.D.A/C-31183 | 10,000.00 | |
| | ADD: SHARE SUBCRIPTION 2025-26 | 3,63,07,000.00 | 51,75,87,500.00 | 10,293.52 | MDCC BANK CURRENT A/C 481 | 9,585.52 | 19,585.52 |
| | (1035175 SHARES OF RS.500/-EACH) | | | | | | |
| | | | | | **INVESTMENT** | | |
| 13,57,51,136.17 | **RESERVE FUND** | | | 13,57,54,000.00 | INVESTMENT F.D.RESERVE FUND | 15,09,93,691.00 | |
| | AS PER LAST B/S | 13,57,51,136.17 | | 12,46,054.00 | INVESTMENT F.D.STAFF GRATUITY | 14,48,414.00 | |
| | ADD:ENTRANCE FEES | 25,100.00 | | 13,28,794.00 | INVESTMENT STAFF GRATUITY-LIC | 14,23,807.00 | |
| | ADD: APPROPRIATION 2024-25 | 1,51,25,282.58 | | 500.00 | SHARE TO MUMBAI KOKAN SAL.EAR. | 500.00 | |
| | ADD: UNCLAIMED DIVIDEND | 78,747.00 | 15,09,80,265.75 | 500.00 | SHARE TO MUMBAI SAL.EAR.SANGH | 500.00 | |
| | | | | 0.00 | SHARE TO MAH.RAJYA SAH.SANGH.LTD. | 1,000.00 | |
| | **OTHER FUNDS** | | | 8,80,00,000.00 | INVESTMENT WITH UBI (LIQUIDITY) | 11,25,00,000.00 | |
| 49,06,129.99 | DIVIDEND EQUALISATION FUND | 52,82,073.99 | | 1,000.00 | INVESTMENT MDCC BANK SHARES | 1,000.00 | 26,63,68,912.00 |
| 33,66,058.72 | BAD & DOUBTFUL DEBTS FUND | 6,83,490.72 | | | | | |
| 97,44,950.41 | BUILDING FUND | 1,04,91,171.41 | | | **LOANS TO MEMBER** | | |
| 4,23,611.09 | CHARITY FUND | 42,263.09 | | 2,07,75,31,464.79 | **LONG TERM LOAN** | | 2,07,27,00,261.42 |
| 0.00 | CULTURAL ACTIVITY FUND | 4,18,370.00 | | | AS PER LAST B/S | 2,07,75,31,464.79 | |
| 1,33,07,911.25 | DEPOSIT CONTINGENCY FUND | 1,37,23,458.25 | | | ADD: ADVANCE DURING YEAR | 52,32,01,280.36 | |
| 7,54,290.00 | CO-OP TRAINING FUND | 15,15,811.26 | 3,21,56,638.72 | | LESS: RECOVERIES DURING YEAR | 52,42,48,996.73 | |
| | | | | | LESS:INTEREST ACCRUED ON NPA | 37,83,487.00 | |
| | **OTHER FUNDS [STAFF]** | | | | | | |
| 26,69,271.00 | STAFF GRATUITY FUND | 29,48,724.00 | | 23,08,146.00 | **SHORT TERM LOAN** | | 11,30,643.00 |
| 150000.00 | STAFF WELFARE FUND | 1,50,000.00 | 30,98,724.00 | | AS PER LAST B/S | 23,08,146.00 | |
| | | | | | ADD: ADVANCE DURING THE YEAR | 31,15,052.41 | |
| | **MEMBERS WELFARE SCHEME** | | | | LESS: RECOVERIES DURING YEAR | 42,92,555.41 | |
| 6,39,37,660.86 | MEMBER DEATH BENEVOLENT SCHEME | 8,13,00,480.69 | | | | | |
| 4,92,12,403.04 | SURETY GUARANTEE SCHEME | 5,53,31,844.04 | | | **STAFF LOANS AND ADVANCES** | | |
| 14,81,831.39 | EDUCATION WELFARE SCHEME | 16,16,250.39 | | 1,03,800.00 | FESTIVAL ADVANCE | 1,35,200.00 | |
| 52,48,940.40 | HOLIDAY HOME SCHEME(SUBS.TIE UP) | 33,01,369.40 | | 36,86,857.00 | CLEAN LOAN | 36,10,109.00 | |
| 2,51,82,352.37 | KARJ MUKTI HAMI YOJANA | 2,98,68,772.37 | | 1,10,36,129.00 | HOUSING LOAN | 1,10,30,297.00 | |
| 2,69,65,255.69 | DHANWANTARI MEDICAL SCHEME | 3,31,54,090.93 | 20,45,72,807.82 | 5,59,403.00 | INT. RECEIVABLE ON STAFF H.LOAN | 12,23,658.00 | 1,59,99,264.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | MEMBERS WELFARE SCHEME SUBS. | | | | OTHER ADVANCE | | |
| 7,38,89,935.02 | SURETY GUARANTEE SUBS.(REFD) | 8,71,67,410.02 | | 17,70,200.00 | ADV. FOR SOFTWARE DEVELOPEMENT | | 17,70,200.00 |
| 15,32,21,997.46 | M.D.B.S.SUBSCRIPTION [REFD] | 16,88,21,251.78 | | | | | |
| 3,56,14,472.75 | DHANWANTRI MEDICAL SUBS. (REFD) | 3,83,49,268.70 | 29,43,37,930.50 | 1,44,449.19 | EDP SOFTWARE & HARDWARE | | 86,669.51 |
| | | | | | AS PER LAST B/S | 1,44,449.19 | |
| | BORROWED FUND | | | | ADD: CURRENT YEAR PURCHASE | 0.00 | |
| 86,78,66,838.96 | UNION BANK SOD A/C - 35067 | | 66,95,93,369.95 | | LESS: DEPRECIATION @40% p.a. | 57,779.68 | |
| | | | | | | | |
| | DEPOSIT | | | 14,43,487.92 | FURNITURE & FIXTURE | | 14,39,739.12 |
| 27,97,78,720.00 | DHANLAKSHMI F.D.FROM MEMBERS | 37,84,34,858.00 | | | AS PER LAST B/S | 14,43,487.92 | |
| 10,85,445.00 | DHANLAXMI FD PAYABLE(MATURITY) | 12,12,922.00 | | | ADD: CURRENT YEAR PURCHASE | 1,48,000.00 | |
| 8,74,000.00 | RECURRING DEPOSIT | 5,08,000.00 | 38,01,55,780.00 | | LESS: DEPRECIATION @10% p.a. | 1,51,748.80 | |
| | | | | | | | |
| | AUDIT FEES PAYABLE | | | 2,46,267.63 | OFFICE EQUIPMENT | | 2,09,327.49 |
| 12,76,440.00 | STATUTORY AUDIT FEES PAYABLE | 10,62,000.00 | | | AS PER LAST B/S | 2,46,267.63 | |
| 49,500.00 | TAX AUDIT FEES PAYABLE | 49,500.00 | | | ADD: CURRENT YEAR PURCHASE | 0.00 | |
| 45,000.00 | INTERNAL AUDIT FEES PAYABLE | 27,000.00 | 11,38,500.00 | | LESS: DEPRECIATION @15% p.a. | 36,940.14 | |
| | | | | | | | |
| | UNCLAIMED DIVIDEND | | | | OTHER ASSETS | | |
| 78,747.00 | 53RD DIVIDEND 2021-22 | 0.00 | | 3,60,000.00 | PREPAID EXPN.(HOLIDAY-HOME) | 4,21,075.00 | |
| 14,063.00 | 54TH DIVIDEND 2022-23 | 14,063.00 | 14,063.00 | 0.00 | LOAN RECOVERY CHARGES RECEIVABLE | 2,15,206.00 | |
| | | | | 67,623.00 | ACCRUED INTEREST ON INVESTMENT | 70,002.00 | |
| | LIABILITIES & PROVISIONS | | | 0.00 | INCOME TAX AY-2014-15 | 4,70,844.00 | |
| 1,82,69,338.00 | DHANLAXMI FD.INT.PAYB(MATURITY) | 2,23,78,989.00 | | 6,67,000.00 | INCOME TAX AY-2015-16 | 0.00 | |
| 51,62,976.00 | PROVISION FOR STANDARD ASSEST | 51,62,976.00 | | 9,240.00 | INCOME TAX AY-2016-17 | 0.00 | |
| 41,22,836.00 | PROV. SUBSTAND. & DOUBTFUL ASSET | 70,63,664.00 | | 6,89,916.00 | INCOME TAX AY-2016-17 | 0.00 | |
| 80,251.00 | SUNDRY PAYABLES | 85,151.00 | | 26,90,391.00 | INCOME TAX AY-2017-18 | 0.00 | |
| 1,98,340.00 | T.D.S.ON BILLS PAYABLE | 2,46,443.00 | | 33,60,998.00 | INCOME TAX AY-2018-19 | 0.00 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4,765.00 | FESTIVAL GIFT 0.50% 2021-22 | 0.00 | | 27,90,185.00 | INCOME TAX AY-2019-20 | 0.00 | |
| 782.00 | FESTIVAL GIFT 0.50% 2022-23 | 0.00 | | 29,08,736.00 | INCOME TAX AY-2020-21 | 0.00 | |
| 1,417.18 | TELEPHONE BILLS PAYABLE | 1,417.18 | | 25,34,745.00 | INCOME TAX AY-2021-22 | 0.00 | |
| 2,78,590.00 | PROFESSIONAL FEES PAYABLE | 0.00 | | 30,65,405.00 | INCOME TAX AY-2022-23 | 0.00 | |
| 1,75,068.00 | SOFTWARE DEVLP.& MAINT. PAYBLE | 1,92,348.00 | | 19,97,984.00 | INCOME TAX AY-2023-24 | 0.00 | |
| 1,400.00 | PROFESSIONAL TAX EMP | 1,400.00 | | 23,38,767.00 | INCOME TAX AY-2024-25 | 0.00 | |
| 770.00 | MISCELLANEOUS EXP.PAYABLE | 0.00 | | 27,31,446.00 | INCOME TAX AY-2025-26 | 0.00 | |
| 0.00 | INCOME TAX AY 2011-12 | 81,560.00 | | 0.00 | INCOME TAX AY-2026-27 | 9,29,484.00 | 21,06,611.00 |
| 0.00 | INCOME TAX AY 2013-14 | 81,53,240.00 | | | | | |
| 26,90,391.00 | INCOME TAX AY-2017-18 | 2,23,250.00 | | | | | |
| 33,60,998.00 | INCOME TAX AY-2018-19 | 0.00 | | | | | |
| 27,90,185.00 | INCOME TAX AY-2019-20 | 0.00 | | | | | |
| 29,08,736.00 | INCOME TAX AY-2020-21 | 0.00 | | | | | |
| 25,34,745.00 | INCOME TAX AY-2021-22 | 0.00 | | | | | |
| 30,65,405.00 | INCOME TAX AY-2022-23 | 0.00 | | | | | |
| 19,97,984.00 | INCOME TAX AY-2023-24 | 0.00 | | | | | |
| 23,38,767.00 | INCOME TAX AY-2024-25 | 0.00 | | | | | |
| 27,31,446.00 | INCOME TAX AY-2025-26 | 0.00 | 4,35,90,438.18 | | | | |
| | | | | | | | |
| 6,05,01,130.30 | **PROFIT AND LOSS A\C** | | | | | | |
| | BALANCE PROFIT | 249.72 | | | | | |
| | PROFIT TRF FROM P&L A/C | 6,46,04,945.42 | 6,46,05,195.14 | | | | |
| | | | | | | | |
| **2,35,13,93,782.05** | **TOTAL Rs.** | | **2,36,18,31,213.06** | **2,35,13,93,782.05** | **TOTAL Rs.** | | **2,36,18,31,213.06** |

**KALE & KOYANDE**
**Chartered Accountant**

DATE : 27-07-2026
PLACE : MUMBAI

**PRASHANT S. SURVE** CHAIRMAN

**ROHAN G. GODASE** VICE CHAIRMAN

**SACHIN A. NARHARI** HON. SECRETARY

**VISHNU D. KOKANE** JOINT SECRETARY

**PRASANNA G. DAMLE** TREASURER

# BUDGET STATEMENT FOR THE FINANCIAL YEAR 2026-27

| Sr. No. | Expenditure | 2025-26 Budgeted | Actual 2025-26 | Excess Expenditure | Budget 2026-27 |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Staff Salary, PF, LTA, Medical, Bonus, Gratuity Ex-gratia | 65,00,000.00 | 55,45,361.86 | - | 65,00,000.00 |
| 2. | Meeting allowance, Conveyance Meeting expenses, Daily allowance to M.C. Member | 10,00,000.00 | 616624.00 | - | 10,00,000.00 |
| 3. | Management Expenses : Conveyance, entertainment, Postage & Courier, Tax & Other | 30,00,000.00 | 26,52,666.37 | - | 30,00,000.00 |
| 4. | Printing & Stationery | 3,00,000.00 | 2,61,905.64 | - | 3,00,000.00 |
| 5. | A. G. M. Expenses | 6,00,000.00 | 7,95,849.08 | 1,95,849.08 | 8,00,000.00 |
| 6. | Depreciation | 4,00,000.00 | 2,46,468.62 | - | 2,50,000.00 |
| 7. | Statutory Audit fees, Internal Audit Fees, Tax Audit fees, System Audit | 20,00,000.00 | 13,54,796.00 | - | 15,00,000.00 |
| 8. | Income Tax | 30,00,000.00 | 8,63,981.00 | - | - |
| 9. | Provision for Sub Standard & Doubtful assets expenses | 5,00,000.00 | 0.00 | - | 20,00,000.00 |
| 10 | Capital Expenses - Software & other | - | - | - | 8,00,000.00 |
| | **Total** | **1,73,00,000.00** | **1,23,37,652.57** | **1,95,849.08** | **1,61,50,000.00** |

# नफा विभागणी २०२५-२०२६
# PROFIT DISTRIBUTION 2025-2026

| | | |
|---|---|---|
| 1. | राखीव निधी (२५%)<br>RESERVE FUND (25%) | 1,61,51,298.79 |
| 2. | लाभांश (सूचित) ९%<br>DIVIDEND 9%(PROPOSED ON PRO-RATA) | 4,48,77,326.00 |
| 3. | इमारत निधी<br>BUILDING FUND | 2,500.00 |
| 4. | थकित कर्ज निधी<br>BAD & DOUBTFUL DEBTS FUND | 19,64,000.00 |
| 5. | सहकार प्रशिक्षण निधी<br>CO-OP TRAINING FUND | 2,000.00 |
| 6. | शैक्षणिक गुणगौरव निधी<br>EDUCATION WELFARE FUND | 2,000.00 |
| 7. | लाभांश समिकरण निधी<br>DIVIDEND EQUALISATION FUND | 2,000.00 |
| 8. | विश्रामगृह निधी<br>HOLIDAY HOME TIE-UP FUND | 11,00,000.00 |
| 9. | धर्मादाय निधी<br>CHARITY FUND | 5,00,000.00 |
| 10. | सांस्कृतिक कार्यक्रम निधी<br>CULTURAL ACTIVITY FUND | 2,000.00 |
| 11. | ठेव आकस्मिकता निधी<br>DEPOSIT CONTINGENCY FUND | 2,000.00 |
| 12. | शिल्लक नफा<br>BALANCE PROFIT | 70.36 |
| | एकूण नफा<br>TOTAL PROFIT | 6,46,05,195.14 |

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT

**To,**
**Chairman / Secretary / Members,**
**Union Bank of India Employee's Co-op. Credit Society Ltd. Mumbai - 400001.**

**Report on the Financial Statements as a Statutory Auditor**

1. We have audited the accompanying financial statements of Union Bank of India Employee's Co-op. Credit Society Ltd., which comprise the Balance Sheet as at 31st March 2026 and the Statement of Profit and Loss for the year ended and a summary of significant accounting policies and other explanatory information incorporated in these financial statements of the Society audited by us for the period from 1st April 2025 to 31st March 2026.

**Management's Responsibility for the Financial Statements**

2. Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rules there under. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

3. Our responsibility is to express and opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with applicable Standards by The Institute of Chartered Accountants of India and under the MCS Act. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement.

4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedure selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Society's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Opinion**

6. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts together with the notes thereon give the information required as per the Maharashtra Co-operative Societies Act 1960, in the manner so required for the society gives a true and fair view in conformity with the accounting Principles generally accepted in India:

I) In the case of the Balance Sheet, of the state of affairs of the society as at 31st March, 2026
ii) In the case of the Statement of Profit and Loss of the profit for the year ended on that date; and

**Report on Other Legal and Regulatory Matters**

7. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in accordance with the provision of the Maharashtra State Co-operative Act.

**8. We report that :**

a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.
b) The transactions of the Society, which have come to our notice, have been within the powers of the Society.
c) The returns received from the Society offices have been found adequate for the purposes of our audit.

**9.** In our opinion, the Balance Sheet and Profit and Loss Account comply with applicable Accounting Standards.

**10. We further report that :**

I) The Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns.
ii) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Society so far as appears from our examination of these books.
iii) For the year under audit, the Society has been awarded "A" classification.

UDIN : 26100087AHIHAP5356
Mumbai, Dated - 27th July, 2026

**For Kale & Koyande (Chartered Accountants FRN: 120223W)**
**Bansi Kale ( Partner)**
**M. No. 100087**

# वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,

**अध्यक्ष/मानद सचिव/सभासद**

युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.

**सनदी लेखापाल म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल सन २०२५-२६.**

१. युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को.-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरीक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च २०२६ पर्यंतचे असून वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही ०१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्या खाली बनविलेले नियम याअन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरणपत्र तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

**लेखापरीक्षकाची जबाबदारी**

३. केलेल्या लेखापरीक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरीक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरीक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितितत्वाच्या पालनाची जरुरी आहे व ती आम्ही पाळली आहे आणि लेखापरीक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासुन मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४. लेखापरीक्षेमध्ये लेखापरीक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे व ते लेखापरीक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबुन आहे. यामध्ये महत्त्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबुन आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५. लेखापरीक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

**अभिप्राय :-**

६. आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पुर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकानी प्रसिध्द केलेली संस्थेला जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे.

(१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२६

(२) नफा व तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च, त्यावर्षीच्या शेवटच्या दिवशी आणि

**इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल :-**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

८. (अ) आम्हाला मिळालेल्या माहीतीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरीक्षणासाठी जरुर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहीतीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

(ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यांत आले आहेत.

(क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९. लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

**१०. आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो :-**

(१) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

(२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

(३) सन २०२५-२६ करिता संस्थेला लेखापरीक्षण वर्ग **"अ"** मिळाला आहे.

**ठिकाण :- मुंबई**

**दिनांक :- २७ जुलै २०२६**

**सही/-**

काळे आणि कोयंडे (सनदी लेखापाल **FRN : 120223W** )

## सभासदांना धनलक्ष्मी मुदत ठेवीवर मिळणारे व्याजदर

| धनलक्ष्मी ठेवीची मुदत | व्याजदर |
|---|---|
| ३ महिने | ६.५०% |
| ६ महिने | ६.७५% |
| १२ महिने | ७.५०% |
| २४ महिने | ८.००% |
| आवर्त ठेव १२ महिने | ७.९०% |
| १२ महिने (सेवानिवृत्त सभासद ६० वर्षावरिल) | ८.५०% |

## विश्रामगृहे




शिर्डी - हॉटेल गणपती पॅलेस



हॉटेल गुलमोहर - मुंबई






हॉटेल अतिथी - कोल्हापूर





अलिबाग - साई इन रिसॉर्ट




हॉटेल हिल बेरी - लोणावळा

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव २०२६



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाची क्षणचित्रे





# संस्थेचा ५९वा वर्धापन दिन सोहळा



**श्री. आर. एस. वडके साहेब**
(संस्थापक)

आपल्या संस्थेचा ५९वा वर्धापन दिन बुधवार दिनांक ०३ जून, २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संस्थेच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी युनियन बँकेचे महाव्यवस्थापक - श्री. अमरेंद्र कुमार झा सर (Zonal Assurance Head, Mumbai) तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. राजेश मतकरी, मानद सचिव श्री. प्रशांत सुर्वे, खजिनदार श्री. रोहन गोडसे, संचालक श्री. विष्णू कोकणे, सौ. प्रियंका पाटील, श्रीम. मेघा आचरेकर, सभासद व कर्मचारी उपस्थित होते.





# युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

## ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची क्षणचित्रे








*Printed & Designed By : Vinod Enterprises : 9820191025*